महाराष्ट्र जनशक्ती
ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : २८८ वे | दिनांक : १४/१०/२०२६ | वार : बुधवार

## ऊसदरावरून राजू शेट्टी आक्रमक; महामार्ग रोखण्याचा इशारा



**कोल्हापूर :** "यंदाच्या गाळप हंगामात उसाला प्रतिटन 5500 रुपये दर मिळावा ही शेतकऱ्यांची रास्त मागणी आहे. साखरेची किमान विक्री किंमत (MSP) 50 रुपये आणि इथेनॉलचा दर 70 रुपये करा, अशी स्पष्ट मांडणी आम्ही केली आहे. तुम्ही वर्षानुवर्षे राष्ट्रीय व राज्य साखर संघाचे अध्यक्ष म्हणून केवळ खुर्च्या उबवल्या; तरी गेल्या आठ वर्षांत साखरेची एमएसपी वाढली नाही, तेव्हा तिथे बसून काय गोट्या खेळत होता का? आणि आता शेतकऱ्यांना दर जाहीर न करता थेट ऊस तोडायला ती काय तुमच्या बापाची पेंड आहे का?", अशा अतिशय आक्रमक शब्दांत स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे अध्यक्ष तथा माजी खासदार राजू शेट्टी यांनी माजी मंत्री आमदार दिलीप वळसे पाटील यांच्यावर जोरदार पलटवार केला आहे. दिलीप वळसे पाटील यांनी राजू शेट्टींच्या उसाच्या 5500 रुपयांच्या मागणीवर "उसाला एवढा दर द्यायला काय तुमच्या काकांनी पैसे ठेवलेत का?", असा उपरोधिक सवाल केला होता. त्याला राजू शेट्टी यांनी अत्यंत आक्रमक भाषेत प्रत्युत्तर दिल्याने आगामी गाळप हंगामाच्या तोंडावर साखर सम्राट विरुद्ध शेतकरी संघटना असा राजकीय व सामाजिक संघर्ष पेटला आहे. नवी दिल्लीतील राष्ट्रीय कृषी विज्ञान केंद्र (पुसा) येथे केंद्रीय मंत्री प्रल्हाद जोशी आणि केंद्रीय कृषिमंत्री शिवराजसिंह चौहान यांच्या उपस्थितीत साखर उद्योग आणि शेतकरी प्रतिनिधींची महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. मात्र, या बैठकीत केंद्र सरकारकडून शेतकऱ्यांच्या मागण्यांवर कोणताही ठोस निर्णय न झाल्याने स्वाभिमानी शेतकरी संघटनेने आरपारची लढाई पुकारली आहे. आज (13 ऑक्टोबर) पुणे-बेंगळुरू राष्ट्रीय महामार्गावरील कोगनोळी टोलनाक्यावर स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या वतीने भव्य 'रास्ता रोको' आंदोलन करण्यात येत आहे. "इथेनॉलचे दर वाढवणे आणि साखरेची एमएसपी 50 रुपये करणे यावर जोपर्यंत केंद्र शासन लेखी निर्णय घेत नाही, तोपर्यंत सीमाभागातील हा महामार्ग खुला केला जाणार नाही," असा ठाम इशारा राजू शेट्टी यांनी दिला आहे. या आंदोलनात कोल्हापूर, सांगली, सातारा आणि कर्नाटकातील सीमाभागातील हजारो शेतकरी ट्रॅक्टर व वाहनांसह दाखल होत आहेत.

## २००४ आणि २००९ ला EVM योग्य, मग आताच प्रश्न का?



**मुंबई :** "2004 आणि 2009 मध्ये जेव्हा ईव्हीएमच्या माध्यमातून यूपीएचे सरकार आले, तेव्हा ईव्हीएम योग्य होते. मात्र, 2014 पासून जेव्हा एनडीएला बहुमत मिळत आहे, तेव्हा ईव्हीएमवर प्रश्नचिन्ह निर्माण केले जात आहेत," अशा शब्दांत राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष आणि खासदार सुनील तटकरे यांनी विरोधकांवर जोरदार पलटवार केला आहे. तसेच, विजयाचे श्रेय स्वतः घ्यायचे आणि पराभवाचे खापर दुसऱ्यावर फोडायचे, ही विरोधकांची भूमिका लोकशाहीला पूरक नसल्याचेही त्यांनी म्हटले आहे. विरोधकांकडून ईव्हीएम आणि मतदार याद्यांवर उपस्थित केल्या जाणाऱ्या प्रश्नांचा समाचार घेताना तटकरे म्हणाले, "2024 च्या लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्रात महाविकास आघाडीला 30 जागा मिळाल्या, मोठ्या फरकाने त्यांना यश मिळाले. त्यावेळी कोणीही ईव्हीएमला दोष दिला नाही किंवा नावे चुकीची असल्याचे बोलले नाही. पण आता विधानसभा निवडणुकीत महायुतीला अभूतपूर्व यश मिळाल्यानंतर यावर टीकाटिप्पणी सुरू झाली आहे. अवघ्या चार महिन्यांत असा काय बदल झाला? मतदार यादी तर तीच होती आणि मशीनही तेच होते." दिल्लीमध्ये 'इंडिया' आघाडीकडून ईव्हीएम आणि मतदार यादीच्या मुद्द्यावरून सुप्रीम कोर्टावर काढण्यात आलेल्या मोर्चाबाबत आणि सरन्यायाधीशांची (CJI) वेळ मागण्याबाबत तटकरे यांनी तीव्र आश्चर्य व्यक्त केले. ते म्हणाले, "देशाची न्यायव्यवस्था स्वतंत्र आहे. अशा वेळी न्यायालयावर मोर्चे काढणे उचित वाटत नाही. मला 25 वर्षे विधानसभेचा आणि 10 वर्षे लोकसभेचा अनुभव आहे. पण सरन्यायाधीशांची भेट मागणं, हा प्रकार मी गेल्या अनेक वर्षांमध्ये पहिल्यांदाच ऐकतोय. न्याय मागण्यासाठी पीआयएल (PIL) किंवा एसएलपी (SLP) सारखे कायदेशीर मार्ग उपलब्ध आहेत, तिथे अशा भेटी मागण्याचे कारण काय?" देशातील आंदोलनांना बाहेरून फंडिंग होत असल्याच्या आरोपांबाबत विचारले असता तटकरे यांनी प्रतिक्रिया दिली. "मला याबद्दल फारशी माहिती नाही. मात्र, जर कुठली बाह्य शक्ती देश अस्थिर करण्याचा प्रयत्न करत असेल, तर ते देशाच्या हिताचे नाही. यासंदर्भात केंद्र सरकार योग्य ती माहिती घेऊन आपली भूमिका स्पष्ट करेल," असे ते म्हणाले. तटकरे म्हणाले, "विरोधकांचा उद्देश स्पष्ट आहे, त्यांना फक्त एनडीएला बदनाम करायचे आहे. लोकशाहीत प्रत्येकाला आपली बाजू मांडण्याचा अधिकार आहे, त्यांनी तो मांडावा. पण देशातील जनता सुज्ञ आहे. नुकत्याच झालेल्या पोटनिवडणुकांमध्ये बंगालपासून तामिळनाडूपर्यंत जनतेने आपला कौल भाजपच्या पारड्यात टाकला आहे. त्यामुळे लोकशाहीत मतपेटीतूनच खरा निकाल समोर येतो," असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

## संदीप देशपांडेंचा भाजपला सवाल; 'निवडणूक आयोगाने प्रवक्ता नेमलंय का?'



**मुंबई :** "मुंबईत मनसे आणि विरोधकांच्या स्वाक्षरी मोहिमेला तसेच मूक आंदोलनाला तरुण वर्गाचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाल्यानंतर भाजप नेत्यांच्या पायाखालची वाळू सरकली आहे. आम्ही थेट केंद्रीय मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या कारभारावर आक्षेप नोंदवून त्यांना जाब विचारत आहोत. मग यात भाजपच्या नेत्यांना मिरच्या का झोंबत आहेत? ज्ञानेश कुमार हे तुमचे कोण लागतात, निवडणूक आयोगाने भाजपला आपला अधिकृत प्रवक्ता म्हणून नेमले आहे का? भाजप ज्या पद्धतीने ज्ञानेश कुमारांची वकिली करत आहे, त्यावरून ज्ञानेश कुमार हा भाजपचाच माणूस म्हणून निवडणूक आयोगात बसवला आहे, हे आता उघडपणे सिद्ध झाले आहे," असा घणाघाती आणि बोचरा पलटवार महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे (मनसे) नेते संदीप देशपांडे यांनी केला आहे. मुंबईत आयोजित पत्रकार परिषदेत बोलताना संदीप देशपांडे यांनी भाजप नेत्यांची विधाने, वडाळा निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडे (RO) मनसेचा धडक मोर्चा, जंतरमंतरवरील आंदोलनांवर घातलेली बंदी, दुष्काळात व्हीआयपी गाड्यांसाठी सरकारने मंजूर केलेले कोट्यवधी रुपये आणि गरबामधील भाजपच्या अटींवर चौफेर टोलेबाजी केली. भाजप आमदार नितेश राणे यांनी ठाकरे कुटुंबीयांवर केलेल्या टीकेचा समाचार घेताना देशपांडे म्हणाले, "भाजपकडे जनतेच्या प्रश्नांवर बोलण्यासाठी कोणतेही तर्कशास्त्र उरलेले नाही. त्यामुळेच ते 'ठाकरे-वाकरे' अशी पोरकट यमक जुळवून वेळ मारून नेत आहेत. मग आम्हीही राणेंना 'काणे' म्हणायचे का? काहीतरी बोलायचे म्हणून बोलणाऱ्यांच्या वक्तव्यांना कोणताही अर्थ नसतो." "या मनमानी कारभाराविरोधात जाब विचारण्यासाठी आज दुपारी १२.३० वाजता मनसेचे शिष्टमंडळ वडाळा येथील निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांच्या (RO) कार्यालयावर थेट धडक देणार आहे. मनसेचे पुढील आंदोलन कसे असेल, याची घोषणा आम्ही उद्या सकाळी करू." दिल्ली पोलिसांनी जंतरमंतरवर आंदोलनाला बंदी घालून रामलीला किंवा बुराडी मैदानावर जाण्याचे फर्मान काढल्याच्या मुद्द्यावर देशपांडे यांनी खास शैलीत फटकारले.

**प्रतिनिधी नेमणे आहे**

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहेत. तालुक्यातील राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक तसेच शैक्षणिक क्षेत्राची माहिती असणाऱ्यास प्राध्यान्य! इच्छुकांनी आपला अल्पपरिचय (बायोडाटा) ७५८८००५००२ या नंबरवर Whatsup करावा.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार १४ ऑक्टोबर २०२६


## डॉ. रफीक झकेरिया कॉलेज फॉर वुमेनमध्ये स्वच्छता आणि शाश्वत विकासावरील कार्यशाळा संपन्न



**छत्रपती संभाजीनगर :** डॉ. रफीक झकेरिया कॉलेज फॉर वुमेन, कॅम्पस-२ यांच्या वतीने छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या सहकार्याने 'जागरूकतेकडून कृतीकडे : स्वच्छता प्रभाव मूल्यांकन' या विषयावर एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांमध्ये स्वच्छता, कचरा व्यवस्थापन, पर्यावरण संवर्धन आणि शाश्वत विकासाविषयी जागरूकता वाढविणे, तसेच स्वच्छ आणि हरित परिसराच्या निर्मितीत सक्रिय भूमिका बजावण्यासाठी त्यांना प्रेरित करणे हा या कार्यशाळेचा उद्देश होता.कार्यशाळेचा मुख्य विषय 'स्वच्छ परिसर, हरित परिसर : स्वच्छता आणि शाश्वत विकासाचे दूत म्हणून विद्यार्थी' हा होता. यावेळी स्वच्छता ही केवळ वैयक्तिक सवय नसून सामाजिक जबाबदारी आणि नागरिकांचे कर्तव्य म्हणून स्वीकारण्यावर भर देण्यात आला.या कार्यक्रमाला छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेचे आयुक्त श्री. अमोल येडगे तसेच उपआयुक्त आणि घनकचरा व्यवस्थापन विभागाचे प्रमुख श्री. नंदकिशोर भोम्बे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते.महानगरपालिकेचे आयुक्त श्री. अमोल येडगे यांनी स्वच्छतेचे महत्त्व अधोरेखित करताना सांगितले की, स्वच्छ शहराची निर्मिती केवळ महानगरपालिकेच्या प्रयत्नांतून शक्य नाही, तर त्यासाठी प्रत्येक नागरिकाचा सक्रिय सहभाग आवश्यक आहे. विद्यार्थ्यांमध्ये स्वच्छतेविषयी जागरूकता निर्माण करून त्यांना दैनंदिन जीवनात स्वच्छतेच्या सवयी अंगीकारण्यासाठी प्रेरित करणे ही काळाची गरज आहे. स्वच्छता, कचरा व्यवस्थापन आणि पर्यावरण संवर्धन यांना दैनंदिन जीवनाचा अविभाज्य भाग बनविण्यावर त्यांनी भर दिला.महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या प्रा. विद्या प्रधान यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, स्वच्छ आणि हरित परिसराची निर्मिती केवळ एका अभियानापुरती मर्यादित राहता कामा नये, तर ती महाविद्यालयाच्या नियमित उपक्रमांचा आणि विद्यार्थ्यांच्या दैनंदिन सवयींचा भाग बनली पाहिजे. त्यांनी विद्यार्थ्यांना परिसराची स्वच्छता राखणे, कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावणे आणि पर्यावरण संवर्धनाच्या प्रयत्नांमध्ये सक्रिय सहभाग नोंदविण्याचे आवाहन केले. जागरूक विद्यार्थी आपल्या कुटुंबात आणि समाजात सकारात्मक बदल घडवून आणण्यात महत्त्वाची भूमिका बजावू शकतात, असेही त्यांनी अधोरेखित केले.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मौलाना आझाद महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मकदूम फारुकी होते. अध्यक्षीय मनोगतात त्यांनी सांगितले की, शिक्षणाचा उद्देश केवळ पुस्तकी ज्ञान देणे हा नसून विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जबाबदारी, नागरिकांचे कर्तव्य आणि पर्यावरणाविषयी संवेदनशीलता विकसित करणे हाही आहे. स्वच्छतेला जीवनशैलीचा भाग बनविण्याची तसेच विद्यार्थ्यांनी आपल्या आचरणातून समाजासमोर आदर्श निर्माण करण्याची आवश्यकता त्यांनी अधोरेखित केली. शैक्षणिक संस्थांच्या सक्रिय सहभागातून स्वच्छता आणि शाश्वत विकासाविषयी जनजागृती व्यापक स्तरावर वाढविता येऊ शकते, असेही त्यांनी सांगितले.या कार्यक्रमाला कनिष्ठ महाविद्यालयाच्या उपप्राचार्या श्रीमती नजमा खान आणि महाविद्यालयाचे अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे (IQAC) समन्वयक प्रा. तन्मय पैठणकर यांची विशेष उपस्थिती होती. कार्यक्रमाला महाविद्यालयातील प्राध्यापक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. विद्यार्थिनी सय्यदा कुलसुम यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले, तर प्रा. तन्मय पैठणकर यांनी आभार प्रदर्शन केले.कार्यक्रमात विशेषतः ब्रिक बॉल आणि विद्यार्थिनींनी तयार केलेल्या भित्तिपत्रिकेचे मान्यवरांच्या हस्ते अनावरण करण्यात आले.या कार्यशाळेत कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावणे, परिसराची स्वच्छता राखणे आणि संसाधनांचा जबाबदारीपूर्वक वापर करणे यांवर भर देण्यात आला. तसेच स्वच्छ आणि पर्यावरणपूरक वातावरण निर्माण करण्यासाठी प्रशासन, शैक्षणिक संस्था आणि नागरिक यांच्या सामूहिक प्रयत्नांची आवश्यकता असल्याचे सांगण्यात आले.महानगरपालिकेच्या सहकार्याने आयोजित ही कार्यशाळा पर्यावरण संवर्धन, नागरिकांची जबाबदारी आणि शाश्वत विकासाविषयी जागरूकता वाढविण्याच्या दिशेने महाविद्यालयाचा एक महत्त्वपूर्ण उपक्रम ठरला. या कार्यक्रमातून स्पष्ट संदेश देण्यात आला — स्वच्छता अंगीकारा, पर्यावरणाचे रक्षण करा आणि हरित भविष्याच्या निर्मितीत आपली जबाबदारी पार पाडा.

## कवी अय्युब पठाण लोहगावकर यांचा सत्कार



*छायाचित्र : शिक्षक आमदार विक्रमजी काळेसाहेब हे अय्युब पठाण लोहगावकर यांचा सत्कार करताना दिसत आहे. सोबत आदी मान्यवर आहे.*

**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी) :** लोहगाव येथील सुप्रसिद्ध साहित्यिक तथा कवी अय्युब पठाण लोहगावकर यांचा नुकताच हल्ली मुक्काम बिडकीन येथील त्यांच्या राहत्या घरी मराठवाड्याचे लोकप्रिय शिक्षक आमदार मा. विक्रमजी काळेसाहेब यांनी कविवर्य अय्युब पठाण लोहगावकर यांच्या घरी सदिच्छा भेट देऊन श्री. पठाण यांचा यथोचित सत्कार केला आहे. श्री. पठाण यांची बालभारतीच्या इयत्ता चौथीच्या मराठी माध्यमाच्या अभ्यासक्रमात "कौतुकाची थाप" हा पाठ संपूर्ण महाराष्ट्राच्या 13 कोटी प्राथमिक शाळेच्या इयत्ता चौथीच्या मराठी माध्यमाच्या अभ्यासक्रमात समाविष्ट असून तसेच डॉ. बा. आं. मराठवाडा विद्यापीठच्या बी.ए. तृतीय वर्षाच्या सत्र क्रमांक सहाव्यामध्ये मराठवाडी कवितामध्ये श्री.. पठाण यांच्या "मर्मगंध " या कवितासंग्रहातील " गंध फुलांचा " ही कविता संपूर्ण मराठवाड्याच्या महाविद्यालयातील तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी अभ्यासक्रमामध्ये ही कविता समाविष्ट करण्यात आलेली आहे. याच अनुषंगाने मराठवाड्याचे शिक्षक आमदारांनी अय्युब पठाण लोहगावकर यांचा सत्कार करून त्यांना पुढील साहित्य लेखनास हार्दिक शुभेच्छा दिल्या आहे. याप्रसंगी राष्ट्रवादी माध्यमिक शिक्षक संघाचे जिल्हाध्यक्ष प्रदीप विखे तसेच राष्ट्रवादी प्राथमिक शिक्षक संघाचे जिल्हाध्यक्ष कवी मनोज खुटे, विपूल काळे, प्रथमेश संगेवार,मुदस्सर पठाण, मोईन पठाण यांची विशेष उपस्थिती होती.


मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी.सेंटर

साहिल कॉम्प्युटर्स अ‍ॅण्ड प्रिंटर्स

डॉ.बा.आं.म.विद्यापीठ गेटजवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद.

मो. 8087880274,8956362639, 9270446603, 9405109103

डी.टी.पी. (मराठी, हिंदी, इंग्रजी)

- प्रोजेक्ट रिपोर्ट
- डेझर्टेशन
- पीएच.डी./एम.फिल.थेसिस
- कलर प्रिंट
- डी.एड.,एम.एड.प्रोजेक्ट
- स्कॅनिंग
- स्पायरल व हार्ड बायडींग
- लॅमिनेशन

महाराष्ट्रातील सर्वच विद्यापीठाच्या 1300 पेक्षा जास्त पीएच.डी. 1500 एम.फिल., 4000 हून अधिक डेझर्टेशन्सचा अनुभव, कुशल ऑपरेटर्स, लाईट गेल्यास इन्व्हर्टरची सोय असलेले मराठवाड्यातील नं. 1 चे डी.पी.पी. सेंटर

अनुभव नसलेल्यांकडे जाऊन मानसिक व आर्थिक त्रास करून घेण्यापेक्षा.. अनुभवी ऑपरेटर्सकडून अचूक व उत्कृष्ट कामासाठी अवश्यक संपर्क साधा.

Contact No.- 8956362639 / 8087880274

Email - sahilcomputer05@gmail.com



बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार १४ ऑक्टोबर २०२६


## नवरात्र उत्सव

अश्विन शुद्ध प्रतिपदेला
घरोघरी घटस्थापना
पूजा अर्चा करूनी
करू दुर्गामातेची आराधना

नऊ दिवस नैवेद्य
देवीला करू अर्पण
नऊ दिवस नऊ रंगाचे
अंगी वस्त्रे परिधान

नऊ रात्री चाले
दांडीया गरबा खेळ
नाचू गाऊ तालात
बसवूनी मेळ

गोंधळ मांडू देवीचा
उदो उदो गजर भक्तीचा
भक्तास आशिष दे माते
महिमा तुझ्या आदी शक्तींचा

दुर्गामातेच्या सभोवताल
धूप अगरबत्तीचा दरवळ
भक्तीमय वातावरणात
फुलांचा पसरे परिमळ

सदैव तुझी कृपादृष्टी
राहू दे भोळ्या भक्तावर
नऊ रूपे प्रकट करूनी
दुषप्रवृतीचा कर संहार



- **रवींद्र चालीकवार**
**मु.पो.ता.महागाव**
**जि.यवतमाळ**
**मो.९०११५५९१०६**

## नारी शक्ती

नारी शक्ती घरोघरी,
आहे प्रेमाचा सागर.
घ्यावे भरून सदैव,
प्रेमरूपी हो घागर. १

कष्ट करून सतत,
देते सर्वांना आनंद.
दुःख लपवून स्वतः,
सेवा करते बेधुंद. २

नारी शक्ती आहे भारी,
नाही जगतांना स्वार्थ.
समजून सांगणार,
जगण्याचे मतितार्थ. ३

फुलवून प्रेम मळा,
जोपासते सर्व नाती.
देई सर्वांना आनंद,
सांभाळून नातीगोती. ४

सदा संकट काळात,
तीच रक्षण करते.
आनंदाने संसारात,
रंग विविध भरते. ५

सदा सर्वांनी करावे,
नारी शक्तीचा आदर.
नित्य करत असते,
सर्वांसाठी ती जागर. ६



**नागेश बोंतेवाड,**
**छत्रपती संभाजीनगर**

## माजी मंत्री जयदत्त (अण्णा) क्षीरसागर यांच्या हस्ते प्राचार्य केशव भांगे यांचा सत्कार



**शिरूर कासार :** कालिकादेवी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक तथा प्राचार्य केशव भांगे साहेब यांना महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ,मुंबई यांचा 'उत्कृष्ट प्राचार्य' राज्यस्तरीय पुरस्कार-२०२६' चा हा पुरस्कार मिळाल्यामुळे माजी मंत्री जयदत्त (अण्णा) क्षीरसागर साहेब यांनी हृदय सत्कार करून शुभ-आशीर्वाद दिले. पत्रकार संघाचा हा पुरस्कार अतिशय प्रतिष्ठेचा व मानाचा असल्यामुळे शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या गुणवान व कर्तुत्वान असणाऱ्या मुख्याध्यापक तथा प्राचार्य यांना दिला जातो.तेव्हा हा मिळालेला पुरस्कार सर्वांसाठी प्रेरणादायी असतो.तसेच विविध स्पर्धा परीक्षेमध्ये आणि मैदानी खेळामध्ये तालुका,जिल्हा,विभागीय आणि राज्यस्तरीय पातळीवर खेळण्यासाठी निवड केली जाते.अशा विजेत्या खेळाडूमुळे शाळा,महाविद्यालय आणि संस्था यांचा लौकिक वाढतो.म्हणूनच विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकी ज्ञान देऊन चालणार नाही तर संशोधन क्षेत्राबरोबरच सांस्कृतिक,क्रीडा या क्षेत्रातही त्यांना प्रोत्साहन मिळण्यासाठी प्रयत्न आवश्यक आहेत.असे प्रतिपादन मा.जयदत्त (अण्णा) क्षीरसागर यांनी या सत्कार प्रसंगी बोलतांना केले.तसेच विद्यालयाचे प्राचार्य केशव भांगे यांच्या शैक्षणिक कार्याची दखल घेऊन महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ,मुंबई यांचा राज्य पुरस्कार मिळाल्याबद्दल विशेष कौतुक केले.तसेच विद्यालयाच्या प्रगती आणि वाटचालीबद्दल समाधान व्यक्त केले.शिरूर (कासार) येथील कालिकादेवी कला,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात बीड जिल्ह्याच्या लोकनेत्या,कर्मयोगिनी मा.खा.स्व.सौ.केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर उर्फ काकू यांच्या स्मृतिप्रित्यर्थ उभारण्यात आलेल्या स्मृती दालनाचे उद्घाटन मा.जयदत्त(अण्णा)क्षीरसागर यांच्या हस्ते करण्यात आले.त्याचबरोबर शालेय क्रीडा स्पर्धेमध्ये प्राविण्य मिळविणाऱ्या विद्यार्थी व विद्यार्थिनींचा स्मृतिचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.याप्रसंगी ते बोलत होते.यावेळी शिरूर कासार तालुक्यातील विविध क्षेत्रातील पदाधिकारी,जि.प.सदस्य, पंचायत समिती सदस्य,ज्येष्ठ कार्यकर्ते,युवा नेते,नगरसेवक, व्यापारीवर्ग,विद्यालयातील कनिष्ठ प्राध्यापक,शिक्षक,शिक्षकेत्तर कर्मचारी यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# कर्करोगाचे लवकर निदान : जागरूकता हीच पहिली पायरी

आजच्या काळात कर्करोग हा सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीने एक महत्त्वाचा विषय बनला आहे. कर्करोगाचे नाव ऐकताच अनेकांच्या मनात भीती निर्माण होते. मात्र, कर्करोगाविषयी योग्य माहिती, वेळेवर निदान आणि आवश्यक उपचार यांमुळे अनेक रुग्णांच्या उपचारांचे परिणाम सुधारण्यास मदत होऊ शकते. त्यामुळे कर्करोगाविषयी समाजात जागरूकता निर्माण करणे ही काळाची गरज आहे.कर्करोगाविरुद्धच्या लढ्यात भीतीपेक्षा जागरूकता आणि दुर्लक्षापेक्षा वेळेवर तपासणी अधिक महत्त्वाची आहे. ० कर्करोग म्हणजे काय?शरीरातील काही पेशी अनियंत्रितपणे वाढू लागतात आणि आसपासच्या ऊतींमध्ये पसरू शकतात, तेव्हा कर्करोग निर्माण होतो. कर्करोगाचे अनेक प्रकार आहेत. त्यांपैकी स्तनाचा कर्करोग, गर्भाशयमुखाचा कर्करोग आणि तोंडाचा कर्करोग हे जनजागृतीच्या दृष्टीने महत्त्वाचे विषय आहेत.तंबाखू आणि तंबाखूजन्य पदार्थांचे सेवन, मद्यपान, काही संसर्ग, वाढते वय, आनुवंशिक घटक आणि काही जीवनशैलीविषयक घटक यांमुळे विशिष्ट प्रकारच्या कर्करोगाचा धोका वाढू शकतो. मात्र, प्रत्येक कर्करोगाचे कारण एकच नसते आणि काही वेळा स्पष्ट जोखीम घटक नसतानाही कर्करोग होऊ शकतो. ० तोंडाचा कर्करोग : तंबाखूच्या सेवनापासून सावध राहाभारतात तोंडाच्या कर्करोगाबाबत जनजागृती करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. गुटखा, खैनी, तंबाखू आणि इतर तंबाखूजन्य पदार्थांचे सेवन तोंडाच्या कर्करोगाचा धोका वाढवते.तोंडात दीर्घकाळ न बरी होणारी जखम, पांढरे किंवा लाल चट्टे, तोंड उघडण्यास त्रास होणे, गिळताना अडचण किंवा गाठ जाणवणे यांसारख्या लक्षणांकडे दुर्लक्ष करू नये. अशी लक्षणे दिसल्यास वैद्यकीय तपासणी करून घेणे आवश्यक आहे. ही लक्षणे म्हणजे कर्करोगच आहे असे नाही; मात्र त्यांचे योग्य मूल्यमापन होणे महत्त्वाचे आहे.तंबाखूचे सेवन पूर्णपणे थांबवणे हा तोंडाच्या कर्करोगाचा धोका कमी करण्याचा महत्त्वाचा मार्ग आहे. ० स्तनाचा कर्करोग : लक्षणे ओळखास्तनाच्या आकारात किंवा त्वचेत नवीन बदल दिसणे, स्तनात गाठ जाणवणे, स्तनाग्र आत ओढले जाणे किंवा स्तनाग्रातून रक्तमिश्रित स्त्राव येणे यांसारख्या बदलांकडे लक्ष देणे आवश्यक आहे.स्तनात गाठ जाणवली म्हणजे कर्करोगच आहे असे नाही. अनेक गाठी सौम्य कारणांमुळेही असू शकतात. मात्र, नवीन बदल दिसल्यास डॉक्टरांकडून तपासणी करून घेणे गरजेचे आहे.स्तनाच्या कर्करोगाचे निदान लवकर झाल्यास उपचारांच्या पर्यायांमध्ये वाढ होऊ शकते. वय आणि वैयक्तिक जोखमीनुसार डॉक्टरांच्या सल्ल्याने योग्य तपासणी करून घ्यावी. ० गर्भाशयमुखाचा कर्करोग : प्रतिबंध आणि तपासणीचे महत्त्वगर्भाशयमुखाचा कर्करोग हा अनेक प्रकरणांमध्ये ह्युमन पॅपिलोमाव्हायरस (HPV) या विषाणूच्या दीर्घकालीन संसर्गाशी संबंधित असतो. HPV लसीकरण आणि शिफारशीनुसार गर्भाशयमुखाची तपासणी यांमुळे या कर्करोगाचा धोका कमी करण्यास मदत होते.मासिक पाळीच्या कालावधीव्यतिरिक्त रक्तस्त्राव होणे, लैंगिक संबंधांनंतर रक्तस्त्राव होणे किंवा रजोनिवृत्तीनंतर रक्तस्त्राव होणे यांसारख्या लक्षणांकडे दुर्लक्ष करू नये. अशी लक्षणे इतर कारणांमुळेही होऊ शकतात; त्यामुळे योग्य वैद्यकीय तपासणी आवश्यक आहे.कर्करोगाच्या सुरुवातीच्या टप्प्यात लक्षणे नसू शकतात. म्हणूनच पात्र महिलांनी लागू असलेल्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार आणि वैद्यकीय सल्ल्यानुसार तपासणी करून घेणे महत्त्वाचे आहे. ० कर्करोगाचे लवकर निदान का महत्त्वाचे?कर्करोगाची काही लक्षणे इतर सामान्य आजारांसारखी असू शकतात. त्यामुळे लक्षणे दिसल्यास स्वतःहून निदान न करता डॉक्टरांचा सल्ला घ्यावा.तपासणीमध्ये डॉक्टर आवश्यकतेनुसार शारीरिक तपासणी, प्रयोगशाळेतील चाचण्या, इमेजिंग किंवा बायोप्सी सुचवू शकतात. कोणती तपासणी आवश्यक आहे, हे संशयित कर्करोगाचा प्रकार आणि रुग्णाची परिस्थिती यांवर अवलंबून असते.लक्षणे नसलेल्या प्रत्येक व्यक्तीने सर्व प्रकारच्या कर्करोगांच्या चाचण्या करून घेण्याची गरज नसते. योग्य वयोगटातील आणि पात्र व्यक्तींनी संबंधित मार्गदर्शक तत्त्वांनुसार तपासणी करून घेणे अधिक महत्त्वाचे आहे.प्राथमिक आरोग्य केंद्रात आरोग्यविषयक समुपदेशन, उपलब्ध सुविधांनुसार प्राथमिक तपासणी आणि संशयित रुग्णांना पुढील तपासणीसाठी योग्य आरोग्य संस्थेकडे पाठवण्याचे काम केले जाऊ शकते.कर्करोगाचे निदान झालेल्या रुग्णांना मानसिक आधार देणे आणि त्यांना आवश्यक उपचारांशी जोडणेही महत्त्वाचे आहे. कर्करोग हा संसर्गजन्य आजार नाही. ० कर्करोगापासून बचावासाठी आपण काय करू शकतो?तंबाखू आणि तंबाखूजन्य पदार्थांपासून दूर राहणे, मद्यपान टाळणे, संतुलित आहार घेणे, नियमित शारीरिक हालचाल करणे आणि निरोगी वजन राखणे या सवयी काही कर्करोगांचा धोका कमी करण्यास मदत करतात.योग्य वयोगटात HPV लसीकरणाबाबत वैद्यकीय सल्ला घेणे आणि पात्र व्यक्तींनी शिफारशीनुसार तपासणी करून घेणेही महत्त्वाचे आहे.सर्वात महत्त्वाचे म्हणजे शरीरात दिसणाऱ्या असामान्य बदलांकडे दुर्लक्ष करू नये. कोणतेही लक्षण दिसल्यास घाबरून न जाता वेळेवर वैद्यकीय सल्ला घ्यावा.

**- डॉ प्रतीक्षा राजपूत (वैद्यकीय अधिकारी)**
**- प्रा आ केंद्र औराळा**

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार १४ ऑक्टोबर २०२६


## जि.प.प्रा. शाळा नवीन वसाहत येथे व्यवस्थापन समितीची निवड



**कन्नड (अरुण थोरात) :** शासन नियमानुसार विद्यमान व्यवस्थापन समितीचा कार्यकाळ पूर्ण झाला असल्या कारणाने नवीन शालेय व्यवस्थापन समिती निवड करण्याची गरज निर्माण झाली त्यातून आयोजित पालक सभेतील सर्व पालकांच्या उपस्थितीत व संमतीने आणि खुल्या चर्चेच्या स्वरूपात अगदी खेळीमेळीच्या वातावरणात दि. 13 आक्टोंबर रोजी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा नवीन वसाहत कें. वासडी ता. कन्नड येथे शालेय व्यवस्थापन समितीची निवड करण्यात आली. शाळेच्या सर्वांगीण विकासासाठी आणि विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता उंचावण्यासाठी नवीन शाळा व्यवस्थापन समितीची सर्वानुमते निवड करण्यात आली.या पालक सभेचे अध्यक्षस्थान मावळते अध्यक्ष अण्णा सर्जेराव बनकर यांनी भूषविले. विद्यमान शाळा व्यवस्थापन समितीच्या सर्व सदस्यांच्या उपस्थितीत सभा पार पडली. यावेळी मावळते अध्यक्ष, उपाध्यक्ष व सदस्य यांच्या हस्ते नवनियुक्त शाळा व्यवस्थापन समितीचा सत्कार करण्यात आला.नवनियुक्त शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष- आप्पासाहेब अंबादास पवार, उपाध्यक्ष- आप्पासाहेब प्रभाकर पवार, मनीषाताई गणेश पवार सदस्य, मयुरी आप्पासाहेब पवार, सदस्य, नंदिनी योगेश पवार सदस्य, भाग्यश्री सुनील बनकर, सदस्य, नुसरत सरवर शहा सदस्य, भैय्यासाहेब घाटगे सदस्य, समाधान पवार सदस्य, (शिक्षणतज्ज्ञ)अण्णा बनकर सदस्य, (ग्रा. पं. प्रतिनिधी) सागर रमणे, सदस्य शिक्षक प्रतिनिधी - श्रीमती किरण सोमदे, सचिव- अपर्णा धाटबळे समिती सभेदरम्यान शाळा व्यवस्थापन समितीची रचना, शासनाचे नियम, मार्गदर्शक सूचना व संबंधित शासन निर्णय यांचे वाचन करण्यात आले. तसेच समितीची कार्यपद्धती, सदस्यांची कर्तव्ये व जबाबदाऱ्या यांची सविस्तर माहिती शाळेच्या मुख्याध्यापिका तथा समितीच्या सचिव श्रीमती अपर्णा कारभारी धाटबळे यांनी सभेपुढे मांडली. व कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. शेवटी शाळेच्या सहशिक्षिका श्रीमती किरण सोमदे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

## जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धेत अंजना स्कूलचा डंका; ९ पदकांची लयलूट, वेदांत जगदाळेची तीन पदकांना गवसणी



**दौलताबाद (जावेद अहमद) :** छत्रपती संभाजीनगर येथे जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाच्या वतीने आयोजित शैक्षणिक वर्ष २०२६–२७ च्या जिल्हास्तरीय आंतरशालेय क्रीडा स्पर्धेत अंजना स्कूल ऑफ एक्सलन्सच्या विद्यार्थ्यांनी २ सुवर्ण, ३ रौप्य आणि ४ कांस्य अशी एकूण ९ पदके पटकावत उल्लेखनीय यश संपादन केले. १९ वर्षांखालील गटात पृथ्वीराज राजपूत याने भालाफेक स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावला. याच गटात वेदांत जगदाळे याने हातोडाफेक स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळवत सुवर्णपदक पटकावले.१९ वर्षांखालील हातोडाफेक स्पर्धेत कार्तिक मोरे याने द्वितीय क्रमांक मिळविला. १७ वर्षांखालील भालाफेक स्पर्धेत प्रेम चंदेल याने द्वितीय क्रमांक पटकावला, तर १४ वर्षांखालील थाळीफेक स्पर्धेत वरद गवळी याने द्वितीय क्रमांक मिळवून रौप्यपदकाची कमाई केली.१७ वर्षांखालील उंच उडी स्पर्धेत ओम निकम याने तृतीय क्रमांक मिळविला. याच गटातील भालाफेक स्पर्धेत ध्रुव वटाणे याने तृतीय क्रमांक पटकावला. तसेच १९ वर्षांखालील गटात वेदांत जगदाळे याने भालाफेक आणि थाळीफेक या दोन्ही स्पर्धांमध्ये तृतीय क्रमांक मिळवत दोन कांस्यपदके पटकावली.यशवंत विद्यार्थ्यांचे शाळेचे संस्थापक अध्यक्ष शंकर पल्हाळ,अध्यक्षा स्मिता पल्हाळ,सचिव स्वर्णजित पल्हाळ,उपाध्यक्षा मोनिका पल्हाळ,प्राचार्या स्नेहा पवार,व्यवस्थापक देव साठे,क्रिडा शिक्षक आकाश इंगळे यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे

## अतनूर येथे मूल्यवर्धन प्रशिक्षण वर्ग



**अतनूर (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा अतनूर येथे येथे मूल्यवर्धन प्रशिक्षण वर्ग पहिली ते आठवी साठी आयोजित केले होते हे प्रशिक्षण श्री गोपीनाथ केंद्रे सरांनी अतनूर केंद्रातील पहिली ते आठवीला शिकवणाऱ्या जिल्हा परिषद व माध्यमिक शाळेत पहिली ते आठवीला शिकवणाऱ्या शिक्षकांना दिले अतिशय सखोल असे मार्गदर्शन श्री गोपीनाथ केंद्रे सरांनी केले विद्यार्थ्यांना चांगली सवय लागावी व विद्यार्थी शाळेत कसे शिस्तीत वागतील याविषयीचे सखोल मार्गदर्शन श्री केंद्रे सरांनी केले अनेक उदाहरणे अनेक प्रात्यक्षिक व गीत गायनातून मूल्यवर्धनाचे धडे श्री केंद्रे सरांनी अतनूर केंद्रातील शिक्षकांना दिले हे प्रशिक्षण ज्येष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी के पी बिरादार साहेब व मंगरूळ केंद्राचे केंद्रप्रमुख श्री पेठे साहेब यांच्या उपस्थितीत पार पडले यावेळी सर्व शिक्षक व मुख्याध्यापक या प्रशिक्षणासाठी उपस्थित होते संकलन राजू नागरगोजे सर




# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार १४ ऑक्टोबर २०२६


# धम्मचक्र प्रवर्तन दिन आणि नव्या पिढीसमोरील आव्हाने



धम्मचक्र प्रवर्तन दिन हा केवळ एका ऐतिहासिक घटनेचे स्मरण करण्याचा दिवस नाही. तो भारतीय समाजाच्या परिवर्तनाच्या दिशेने झालेल्या एका महान वैचारिक प्रवासाचे स्मरण करून देणारा दिवस आहे. १४ ऑक्टोबर १९५६ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी नागपूर येथे लाखो अनुयायांसह बौद्ध धम्माची दीक्षा घेतली. त्या घटनेत केवळ धर्मपरिवर्तन नव्हते; त्यामागे माणसाच्या प्रतिष्ठेचा, स्वातंत्र्याचा, समतेचा, विवेकाचा आणि बंधुत्वाचा नवा सामाजिक संकल्प होता. आज धम्मचक्र प्रवर्तन दिन साजरा करताना आपण स्वतःला एक मूलभूत प्रश्न विचारला पाहिजे—बाबासाहेबांनी आपल्याला नेमके काय दिले आणि आपण त्या तून काय आत्मसात केले? बाबासाहेबांचा वारसा केवळ त्यांच्या प्रतिमेत, पुतळ्यात, जयघोषात किंवा स्मृतिदिनांच्या कार्यक्रमात नाही. त्यांचा खरा वारसा आहे—ज्ञानाची भूक, प्रश्न विचारण्याची वृत्ती, वैज्ञानिक दृष्टिकोन, सामाजिक समता, आत्मसन्मान, संविधानिक मूल्ये आणि विवेकाधिष्ठित जीवनपद्धती. आजचे जग बाबासाहेबांच्या काळापेक्षा पूर्णपणे वेगळे आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता, जैवतंत्रज्ञान, डिजिटल अर्थव्यवस्था, रोबोटिक्स, अवकाश संशोधन, जनरेटिव्ह एआय, डिजिटल शिक्षण, सोशल मीडिया, डेटा अर्थव्यवस्था आणि नव्या प्रकारच्या रोजगारव्यवस्था जगाला झपाट्याने बदलत आहेत. अशा परिस्थितीत आंबेडकरी विचारांची गरज कमी झालेली नाही; उलट ती अधिक व्यापक आणि अधिक गंभीर स्वरूपात निर्माण झाली आहे. कारण अन्यायाचे स्वरूप बदलले आहे. भेदभावाचे माध्यम बदलले आहे. ज्ञानाचे स्वरूप बदलले आहे. रोजगाराचे स्वरूप बदलले आहे. त्यामुळे संघर्षाची साधने आणि सामाजिक परिवर्तनाची रणनीतीदेखील बदलावी लागणार आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शिक्षणाला सामाजिक मुक्तीचे सर्वात प्रभावी साधन मानले. शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा हा संदेश केवळ एका ऐतिहासिक काळापुरता मर्यादित नाही. आजच्या ज्ञानाधारित अर्थव्यवस्थेत त्याचे महत्त्व आणखी वाढले आहे. पूर्वी शिक्षण म्हणजे शाळा-कॉलेजपर्यंत पोहोचणे हा मोठा टप्पा होता. आज मात्र केवळ पदवी मिळविणे पुरेसे नाही. ज्ञान निर्माण करणे, ज्ञानाचे विश्लेषण करणे, नव्या तंत्रज्ञानाचा वापर करणे आणि ज्ञानाच्या निर्मितीत सहभागी होणे आवश्यक झाले आहे. आज प्रश्न असा नाही की आपल्या समाजातील किती मुले महाविद्यालयात जातात. प्रश्न असा आहे की त्यातील किती मुले संशोधक, वैज्ञानिक, डॉक्टर, अभियंते, प्राध्यापक, उद्योजक, तंत्रज्ञ, प्रशासक, लेखक, धोरणनिर्माते आणि ज्ञाननिर्माते बनत आहेत? आपण डिजिटल जगाचे केवळ ग्राहक राहणार की त्याचे निर्माते होणार? हा प्रश्न अत्यंत महत्त्वाचा आहे. मोबाईल हातात असणे म्हणजे डिजिटल साक्षरता नव्हे. इंटरनेटचा वापर करणे म्हणजे ज्ञानप्राप्ती नव्हे. सोशल मीडियावर हजारो फॉलोअर्स असणे म्हणजे बौद्धिक प्रगती नव्हे. माहिती आणि ज्ञान यांच्यातील फरक समजून घेणे ही आजची मोठी गरज आहे. आंबेडकरी समाजाने या नव्या ज्ञानविश्वात आघाडीवर राहिले पाहिजे. सामाजिक आणि शैक्षणिक विषमता दूर करण्यासाठी आरक्षणाने ऐतिहासिक भूमिका बजावली आहे. वंचित समूहांना शिक्षण, रोजगार देण्यात आरक्षणाचे महत्त्व नाकारता येणार नाही. मात्र एक गोष्ट स्पष्टपणे समजून घेणे आवश्यक आहे—आरक्षण हा सामाजिक उन्नतीचा एक महत्त्वाचा मार्ग आहे; तो सामाजिक परिवर्तनाचा एकमेव मार्ग नाही. आरक्षणातून एखाद्या व्यक्तीला शिक्षणाची किंवा रोजगाराची संधी मिळू शकते; पण त्या व्यक्तीच्या कुटुंबातील आणि समाजातील विचारविश्व बदलण्यासाठी शिक्षणाची गुणवत्ता, सांस्कृतिक भांडवल, वैज्ञानिक दृष्टिकोन, आर्थिक स्वावलंबन, सामाजिक शिस्त आणि मूल्याधिष्ठित जीवनपद्धती आवश्यक आहे. आरक्षणाच्या माध्यमातून काही पिढ्यांना संधी मिळाल्यानंतर त्या संधीचे रूपांतर पुढील पिढ्यांच्या ज्ञानसंपदेत झाले पाहिजे. एका व्यक्तीची नोकरी ही केवळ त्या व्यक्तीची उपलब्धी नसावी; ती एका कुटुंबाच्या सामाजिक परिवर्तनाची सुरुवात असावी. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बौद्ध धम्म स्वीकारताना केवळ धार्मिक ओळख बदलली नाही; त्यांनी मानवी मूल्यांवर आधारित जीवनपद्धतीचा स्वीकार करण्याचा मार्ग दाखविला. महाराष्ट्रातील नवबौद्ध समाजाच्या प्रवासाकडे पाहिले तर शिक्षण, सरकारी सेवा, व्यावसायिक क्षेत्र, साहित्य, पत्रकारिता, कला, राजकारण, सामाजिक चळवळ आणि सार्वजनिक जीवनात झालेली प्रगती लक्षात येते. या परिवर्तनाचे श्रेय एका घटकाला देणे योग्य ठरणार नाही; त्यामागे शिक्षणाची आकांक्षा, सामाजिक चळवळी, संविधानिक हक्क, आरक्षण, शहरीकरण, संघटन आणि आंबेडकरी विचार यांसारख्या अनेक घटकांची भूमिका आहे. या अनुभवातून इतर वंचित समाजघटकांनी शिकण्यासारखे बरेच काही आहे. मात्र याचा अर्थ असा नाही की एका समाजघटकाने दुसऱ्यापेक्षा अधिक प्रगती केली म्हणून इतर समुदायांना दोष द्यावा. अनुसूचित जातींमधील विविध समूहांची ऐतिहासिक, आर्थिक, भौगोलिक आणि शैक्षणिक परिस्थिती वेगवेगळी आहे. त्यामुळे त्यांच्या प्रगतीच्या संधी आणि अडचणीही वेगवेगळ्या आहेत. मात्र एक समान प्रश्न सर्वांसमोर आहे—आपण पारंपरिकतेच्या चौकटीत राहणार की ज्ञान-विज्ञानाच्या नव्या जगात प्रवेश करणार? परंपरा म्हणजे नेहमीच वाईट असे नाही. प्रत्येक समाजाच्या सांस्कृतिक स्मृती, परंपरा आणि सामूहिक अनुभवांना महत्त्व असते. पण जी परंपरा माणसाच्या प्रश्नांना उत्तर देत नाही, जी विषमता टिकवते, जी अंधश्रद्धेला प्रोत्साहन देते आणि जी विवेकाला प्रश्न विचारण्यापासून रोखते, तिचे चिकित्सक परीक्षण झाले पाहिजे. डॉ. आंबेडकरांचा दृष्टिकोन मूलतः चिकित्सक होता. म्हणूनच आज आपल्याला स्वतःच्या समाजातील अंधश्रद्धा, कर्मकांड, अवैज्ञानिक समजुती, रूढी, व्यसनाधीनता, अनारोग्यकारक सामाजिक प्रथा आणि विवेकविरोधी प्रवृत्ती यांचेही आत्मपरीक्षण करावे लागेल. बाबासाहेबांचा फोटो घरात असणे महत्त्वाचे आहे; पण बाबासाहेबांचा विचार घरातील निर्णयप्रक्रियेत असणे त्याहून महत्त्वाचे आहे. मुलाच्या शिक्षणाबाबत आपण वैज्ञानिक दृष्टिकोन ठेवतो का? मुलीच्या शिक्षणाला मुलाइतकेच महत्त्व देतो का? घरातील स्त्रीला निर्णयप्रक्रियेत समान स्थान देतो का? आरोग्याच्या प्रश्नांवर डॉक्टर आणि विज्ञानावर विश्वास ठेवतो का? अंधश्रद्धेपेक्षा तर्काला महत्त्व देतो का? सोशल मीडियावर आलेली प्रत्येक माहिती खरी मानण्यापूर्वी तिची पडताळणी करतो का? हे प्रश्न आजच्या आंबेडकरी समाजाने स्वतःला विचारले पाहिजेत. आज गुलामीचे स्वरूप बदलले आहे. पूर्वी सामाजिक बहिष्कार, अस्पृश्यता आणि शिक्षणावरील बंदी ही शोषणाची साधने होती. आज त्यासोबतच ज्ञानापासून वंचित राहणे, डिजिटल दरी, कौशल्यांचा अभाव, आर्थिक परावलंबित्व, तंत्रज्ञानाची भीती आणि माहितीच्या चुकीच्या वापराची समस्या निर्माण झाली आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता रोजगाराचे स्वरूप बदलत आहे. ऑटोमेशनमुळे पारंपरिक कामांच्या संधी कमी होऊ शकतात. नवीन कौशल्यांची मागणी वाढत आहे. डेटा हा आर्थिक आणि सामाजिक शक्तीचा महत्त्वाचा स्रोत बनत आहे. अशा वेळी आपल्या समाजातील तरुणांनी फक्त सरकारी नोकरीच्या अपेक्षेवर अवलंबून राहणे पुरेसे ठरणार नाही. सरकारी सेवा महत्त्वाची आहेच; पण त्याचबरोबर उद्योजकता, स्टार्टअप, संशोधन, तंत्रज्ञान, डिजिटल सेवा, कृत्रिम बुद्धिमत्ता, डेटा सायन्स, सायबर सुरक्षा, जैवतंत्रज्ञान, वित्तीय तंत्रज्ञान आणि सर्जनशील उद्योग यांसारख्या नव्या क्षेत्रांमध्येही प्रवेश केला पाहिजे.नव्या अर्थव्यवस्थेत संधींची भाषा बदलत आहे. त्या भाषेचे ज्ञान आपल्याला मिळवावे लागेल. सामाजिक परिवर्तनाची सुरुवात अनेकदा घरापासून होते. आपण मुलांना महागडे मोबाईल देतो; पण पुस्तके देतो का? त्यांना इंटरनेट देतो; पण ज्ञानाचा योग्य वापर शिकवतो का? त्यांना करिअरची स्वप्ने दाखवतो; पण अपयश पचवण्याची मानसिक ताकद देतो का? सुसंस्कृतपणा म्हणजे केवळ चांगले कपडे, मोठे घर किंवा आर्थिक समृद्धी नाही. सुसंस्कृतपणा म्हणजे दुसऱ्याच्या स्वातंत्र्याचा आदर करणे, स्त्री-पुरुष समानता स्वीकारणे, सार्वजनिक ठिकाणी शिस्त पाळणे, स्वच्छता राखणे, मतभिन्नतेचा आदर करणे, हिंसेपासून दूर राहणे आणि विवेकपूर्ण जीवन जगणे. समाजाची खरी प्रगती केवळ उत्पन्न वाढण्यात नाही; ती मानवी संबंधांच्या गुणवत्तेत असते. म्हणून आंबेडकरी समाजाच्या पुढील टप्प्यात सामाजिक शिष्टाचार, सार्वजनिक संस्कृती, वाचनसंस्कृती, वैज्ञानिक दृष्टिकोन, स्त्री-समानता, आरोग्यदायी जीवनशैली आणि संवैधानिक मूल्ये यांना अधिक महत्त्व दिले पाहिजे. आज आपल्या समाजाने एक मूलभूत बदल करणे आवश्यक आहे—नोकरी मागणाऱ्या समाजापासून ज्ञान निर्माण करणाऱ्या समाजाकडे. आपल्याला डॉक्टर हवे आहेत, अभियंते हवे आहेत, प्राध्यापक हवे आहेत; पण त्यापलीकडे संशोधक, शास्त्रज्ञ, लेखक, तंत्रज्ञान निर्माते, धोरणविश्लेषक, उद्योजक आणि विचारवंतही निर्माण झाले पाहिजेत. आपल्या मुलांनी केवळ स्पर्धा परीक्षांची तयारी करावी असे नाही; त्यांनी जग समजून घेण्याची तयारी केली पाहिजे.घराघरांत वाचनालये निर्माण झाली पाहिजेत. विद्यार्थ्यांनी संशोधन केले पाहिजे. तरुणांनी प्रश्न विचारले पाहिजेत. महिलांनी ज्ञाननिर्मितीत पुढे आले पाहिजे. समाजाने गुणवत्तेला प्रोत्साहन दिले पाहिजे. ज्ञानाचे लोकशाहीकरण आणि ज्ञाननिर्मितीत सहभाग हेच पुढील सामाजिक परिवर्तनाचे महत्त्वाचे पाऊल ठरू शकते. आंबेडकरी विचार म्हणजे केवळ बाबासाहेबांनी सांगितलेल्या प्रत्येक वाक्याची पुनरावृत्ती करणे नव्हे. त्यांच्या विचारपद्धतीचा स्वीकार करणे हा खरा आंबेडकरवाद आहे. बाबासाहेबांनी प्रश्न विचारले. त्यांनी पुराव्यांचा शोध घेतला. त्यांनी विद्यमान व्यवस्थेची चिकित्सा केली. त्यांनी शिक्षणावर भर दिला.त्यांनी संविधानिक मार्ग स्वीकारला. त्यांनी मानवमुक्तीला केंद्रस्थानी ठेवले. म्हणून आजच्या काळातील आंबेडकरी विचारसरणीनेही नवे प्रश्न विचारले पाहिजेत. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या युगात सामाजिक न्याय कसा साधायचा? डिजिटल जगात समान संधी कशा निर्माण करायच्या? ज्ञानाच्या अर्थव्यवस्थेत वंचित समूहांचा सहभाग कसा वाढवायचा? नव्या तंत्रज्ञानामुळे निर्माण होणाऱ्या विषमतेला कसे सामोरे जायचे? शिक्षणाची गुणवत्ता सर्वांपर्यंत कशी पोहोचवायची? पर्यावरणीय संकटांचा सर्वाधिक परिणाम वंचित समाजावर होऊ नये यासाठी काय करायचे? हे आजचे आंबेडकरी प्रश्न आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्वीकारलेला बौद्ध धम्म हा त्यांच्या दृष्टीने नैतिक आणि सामाजिक जीवनपद्धतीशी जोडलेला होता. म्हणून धम्मचक्र प्रवर्तन दिन साजरा करताना केवळ धार्मिक विधी करण्यापेक्षा प्रज्ञा, करुणा आणि समता यांचा सामाजिक व्यवहारात स्वीकार करणे अधिक महत्त्वाचे ठरते. धम्म आपल्याला माणूस केंद्रस्थानी ठेवण्याची शिकवण देतो. म्हणून आपल्यातील जातीय अहंकार, स्त्रीद्वेष, अंधश्रद्धा, व्यसनाधीनता, हिंसा, अस्वच्छता, सामाजिक असहिष्णुता आणि परस्परांविषयीचा तिरस्कार यांना दूर करण्याचा प्रयत्न झाला पाहिजे. बाबासाहेबांना अभिप्रेत असलेला समाज केवळ आर्थिकदृष्ट्या सक्षम नसून बौद्धिकदृष्ट्या प्रगल्भ आणि नैतिकदृष्ट्या सुसंस्कृत असला पाहिजे. या धम्मचक्र प्रवर्तन दिनी आपण काही संकल्प करू शकतो— प्रत्येक कुटुंबात वाचनाची सवय निर्माण करू. मुलांच्या शिक्षणाला सर्वोच्च प्राधान्य देऊ. मुलगा आणि मुलगी यांच्यात भेद करणार नाही. अंधश्रद्धेपेक्षा विज्ञान आणि विवेक स्वीकारू. सोशल मीडियावरील माहितीची पडताळणी करू. नवीन तंत्रज्ञान शिकू आणि त्याचा निर्मितीक्षम वापर करू. आरक्षणाच्या हक्काचे संरक्षण करतानाच गुणवत्तापूर्ण शिक्षण आणि कौशल्यविकासावर भर देऊ. व्यसन, हिंसा आणि सामाजिक दुर्गुणांविरुद्ध सामूहिक भूमिका घेऊ. घर, परिसर आणि सार्वजनिक जीवनात सुसंस्कृत वर्तनाचा आग्रह धरू. आपल्या मुलांना केवळ नोकरीसाठी नव्हे, तर ज्ञाननिर्मितीसाठी तयार करू. धम्मचक्र प्रवर्तन दिन आपल्याला भूतकाळाचा अभिमान देतो; पण त्याहून महत्त्वाचे म्हणजे तो भविष्याची जबाबदारीही देतो. आज बाबासाहेबांची गरज पुतळ्यांमध्ये नाही, तर प्रयोगशाळांमध्ये आहे. त्यांची गरज केवळ घोषणांमध्ये नाही, तर ग्रंथालयांमध्ये आहे. त्यांची गरज केवळ स्मारकांमध्ये नाही, तर विद्यापीठांमध्ये आहे. त्यांची गरज केवळ जयंतीच्या मिरवणुकीत नाही, तर ज्ञाननिर्मितीत आहे. त्यांची गरज केवळ राजकीय चर्चेत नाही, तर कुटुंबाच्या संस्कारांमध्ये आहे. आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे—त्यांची गरज केवळ दलित समाजाला नाही; समताधिष्ठित, विवेकनिष्ठ आणि मानवी भारताला आहे. धम्मचक्र प्रवर्तनाचा खरा अर्थ म्हणजे अन्यायाच्या चक्रातून माणसाला बाहेर काढून ज्ञान, विवेक, समता आणि माणुसकीच्या दिशेने नेणे. म्हणून आजची हाक स्पष्ट असली पाहिजे— भूतकाळाचा केवळ गौरव नको; त्यातून भविष्याची निर्मिती हवी. फक्त आरक्षण नको; गुणवत्तापूर्ण शिक्षण हवे. फक्त पदवी नको; ज्ञान हवे. फक्त माहिती नको; विवेक हवा. फक्त तंत्रज्ञानाचा वापर नको; तंत्रज्ञानाची निर्मिती करण्याची क्षमता हवी. फक्त आर्थिक प्रगती नको; सामाजिक आणि सांस्कृतिक प्रगल्भता हवी. आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे बाबासाहेबांची विचारप्रणाली आचरणात आणणे गरजेचे आहे. समता ही जीवनदृष्टी, स्वातंत्र्य हा हक्क, बंधुभाव हा व्यवहाराचा पाया आणि न्याय हे अंतिम साध्य मानून वाटचाल केली, तरच समताधिष्ठित आणि मानवतावादी भारताचे स्वप्न साकार होऊ शकेल. धम्मचक्र प्रवर्तन दिनाच्या निमित्ताने आपण बाबासाहेबांनी दिलेली ज्ञानाची मशाल तेवत ठेवूया. विवेकाचा मार्ग स्वीकारूया. वैज्ञानिक विचाराचा अंगीकार करू या. व्यवहारात समतेचा आग्रह धरू या. आणि नव्या भारताच्या निर्मितीत आंबेडकरी विचारांना नव्या युगाची दिशा देऊया.


प्रा. डॉ. प्रियदर्शन भवरे,

समाजशास्त्र विभाग,

बद्रीनारायण बारवाले महाविद्यालय, जालना.